**भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र**

(सकाळ)

जा.क्र. १२६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २१/०२/२०१७

**१) शेतातुन मोटार पंपाची चोरी . :–**

दिनांक १९/०२/२०१७ चे १८.०० ते दिनांक २०/०२/२०१७ चे ०८.३० वा. दर. यातील फिर्यादी यशंवत राजाराम नाकतोडे वय ३३ वर्ष, रा. भागडी याने शेतातमधील धुऱ्यावर ठेवलेल्या दोन मोटार पंप पैकी एक एलन कंपनीची मोटार ३ एचपी किमंती ६,०००/–रु. ची कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३७९ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहे

**२) गॅस सिलेंडरची चोरी. :–**

दिनांक २०/०२/२०१७ चे ०८.३० वा. दरम्यान. यातील फिर्यादी दामोधर सिताराम कावळे वय ४६ वर्ष, रा. संताजी वार्ड भंडारा हा गॅस गोडावून मधील सिलेंडर घेवुन रिक्षाने गांधी वार्ड येथे आला व सिलेंडर डिलेवरी करीता गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन एक गॅस सिलेंडर किंमती ३,०००/–रु. चा चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. उबाडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) जागेच्या वादावरुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १९/०२/२०१७ चे १३.०० वा. दरम्यान. यातील फिर्यादी व आरोपी यांचे जागेवरुन वाद सुरु असुन यातील चारही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस सार्वजनीक ठिकाणी रस्यावरुन जाण्यास प्रतीबंधक करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्यापीटण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३४१,२९४,५०६,३४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) अल्पवयीन मुलाला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १६/०२/२०१७ चे १०.३० ते १५.०० वा. दरम्यान. यातील अल्पवयीन मुलगा वय १५ वर्ष ७ महीने रा. केसलवाडा ह. मु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर वस्तीगृह पारडी येथुन शाळेत जातो म्हणुन वस्तीगृहातुन निघुन गेला परंतू शाळेत पोहचला नाही. त्यामुळे वस्तीगृह अधिक्षक सुनील महादेव शेंडे यांनी फिर्यादीस दिलेल्या सुचनेवरुन फिर्यादीने वस्तीगृह अधिक्षक सोबत येवुन त्यांनी मुलाला कोणीतरी अज्ञात आरोपीने पळवुन नेले असावे असे फिर्यादी दादाजी किशन गजभिये वय ४८ वर्ष, रा. केसलवाडा यांनी पो. स्टे. ला दिलेल्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३६३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गभणे पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**५) अवैध दारु अडयांवर धाडी . :–**

दिनांक १९/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. कारधा येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०७ गुन्हा दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ४१ लिटर हातभट्टी दारु किंमती २,२९०/–रु. व ३६० मिली देशीदारू लिटर १००/–रु. असा एकुण २३९०/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

21.2

(एस. व्ही. कुलकर्णी )
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.